## थोडक्यात बातम्या

## सहकारी औद्योगिक वसाहती, अन्य पर्यायांची पडताळणीचे निर्देश



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३१, मुंबई :** सोलापूर शहरातील 'रे नगर' येथे कामगारांसाठी प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत वसाहती निर्माण करण्यात आल्या आहेत. या वसाहतींमध्ये कामगारांना रोजगाराचे साधन उपलब्ध करून दिल्यास कामगार रोजगारक्षम होतील. त्यादुष्टीने येथील रहिवाशांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी सहकारी औद्योगिक वसाहती किंवा अन्य पर्यायांची पडताळणी करावी, असे निर्देश सहकार राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत दिले.

बैठकीस आमदार सुभाष देशमुख, उद्योग विभागाचे विकास आयुक्त दिपेंद्र सिंह कुशवाह, गृहनिर्माण विभागाचे उपसचिव श्री.कवडे आदींसह सोलापूर गारमेंट असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

## अल्पसंख्यांक आयुक्तांशी माहिती आयोगाच्या कामकाजाबाबत चर्चा



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३१, छ. संभाजीनगर :** अल्पसंख्यांक आयुक्त म्हणून रूजू झालेल्या प्रतिभा इंगळे यांची भेट घेऊन राज्य माहिती आयुक्त खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने उपसचिव आर.सी. सरोदे यांनी त्यांचे अभिनंदन केले. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने उपसचिव श्री.सरोदे यांनी माहिती आयोगाच्या कामकाजाबाबत चर्चा केली. यावेळी मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक जहीर शेख, कनिष्ठ लिपीक मोहम्मद आमेर उपस्थित होते.

## विंचूर येथे श्री रामेश्वर महादेव मूर्तीची प्राणप्रतिष्ठा



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.३१, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील लासलगाव रस्त्यालगत होळकर वेशीच्या समोर 'श्री रामेश्वर महादेव' मंदिरात महादेवाची पिंड व नंदी यांची प्राणप्रतिष्ठा सोहळा विंचूरचे संदीप गुरु जोशी यांच्या हस्ते संपन्न झाली आहे. महादेवाच्या मूर्तीचे रथातून सहवाद्य, फटाक्यांच्या आतिषबाजीत मिरवणूक काढण्यात आली असून या पूजेसाठी विनोद दरेकर, दादू दरेकर, राजेंद्र गोसावी, श्याम सानप, सोमेश्वर दरेकर, निलेश दरेकर या सहपत्नीक जोडपी पूजेस बसले होती. तर या कार्यक्रमासाठी रत्नाकर दरेकर, भैय्या कर्पे, गोपाळ दरेकर यांनी विशेष योगदान दिले आहे. तर या कार्यक्रमासाठी उपस्थित विंचूरचे प्रथम नागरिक सचिन दरेकर, निलेश सालकाडे, अनिल पुंड, दीपक दरेकर, अनिल थोरात, चंद्रकांत दरेकर, सोनू दरेकर, मारुती दरेकर, आत्माराम दरेकर, ऋषी आहेर, नवनाथ दरेकर, अलोक दरेकर, सागर गरड, वसंत गायकवाड, मोहन कुसळकर आदी ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रमाची सांगता महाप्रसादाने झाली असून अनेक शिवप्रेमी भक्तांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला.

## शेगाव रोजगार सेवकाचे अधिवेशन

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.३१, उदगीर (लातुर) :** उदगीर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत प्रभावी कामासाठी आणि ग्राम रोजगार सहाय्यकांच्या न्याय मागण्यासाठी शेगाव येथे दिनांक ०३ ऑगस्ट २०२५ रोजी महाराष्ट्र राज्याच्या विशेष अधिवेशन बोलाविण्यात आलेले आहे. या अधिवेशनासाठी उदगीर तालुक्यासह संपूर्ण लातूर जिल्ह्यातील ग्राम रोजगार सहाय्यक उपस्थित राहणार आहेत. या अधिवेशनासाठी लातूर जिल्ह्यातील सर्वांना उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष प्रेमचंद आचारी, जिल्हा उपाध्यक्ष सतीश कांबळे, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख दिलिप पांचाळ, जिल्हा सचिव आत्माराम बिरादार यांनी केले आहे. दिनांक ०२ ऑगस्ट रोजी सर्वांनाही अधिवेशन गजानन महाराज संस्थान माळी भवन आनंद सागर जवळ शेगाव येथे दुपारी १ वाजता होणार आहे. या बैठकीमध्ये मानधनाबाबत चर्चा सविस्तर होणार आहे. तसेच जिल्हा निहात संघटना एकत्रिकरण करून एकच संघटना कायम करणे, तालुका निहायता अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव निवड करणे या सभेत आयत्या वेळेस येणाऱ्या विषयावर ही चर्चा करून मार्ग काढण्यात येईल. अशी माहिती जिल्हा सचिव आत्माराम बिरादार यांनी दिली आहे.

## सर्प समज व गैरसमज बाबत मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात संपन्न

**अक्षराज : राजेश पुरी**

**दि.३१, कळंब (धाराशिव) :** नागपंचमीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, धाराशिव जिल्हा व शहर शाखा कळंब यांच्या संयुक्त विद्यमाने आणि आज मॉडेल इंग्लिश स्कूल कळंब व विद्याभवन हायस्कूल कळंब येथे विद्यार्थ्यांसाठी सर्प : समज व गैरसमज या विषयावर प्रबोधनपर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांना सर्पांविषयी शास्त्रीय माहिती व जागृतीपर प्रशिक्षण देण्यात आले. कार्यक्रमात विषारी व बिनविषारी साप यांच्यातील फरक, सापांबद्दलचे गैरसमज व अंधश्रद्धा, सर्पदंश झाल्यास योग्य प्राथमिक उपचार व प्रथम ोपचार पद्धती यांचे सखोल मार्गदर्शन करण्यात आले. तसेच सापांच्या संवर्धनातील महत्त्व व पर्यावरणीय दृष्टिकोनातून त्यांचे स्थान यावरही प्रकाश टाकण्यात आला. कार्यक्रमात प्रात्यक्षिके, चित्र व बॅनर माध्यमातून विद्यार्थ्यांना सर्पांबद्दल योग्य ज्ञान मिळविण्याची प्रमुख मार्गदर्शक म्हणून सर्पमित्र प्रकाशन विभागाचे राज्य कार्यवाह श्री तुकाराम शिंदे यांनी बहुमूल्य मार्गदर्शन केले. तसेच अरविंद शिंदे (जिल्हा कार्याध्यक्ष, महा.अं.नि.स. धाराशिव), बालाजी राऊत (जिल्हा प्रधान सचिव), डॉ. संजय सावंत यांची ही विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे आयोजन व समन्वय मॉडेल इंग्रजी स्कूल चे मुख्याध्यापक येंदे व विद्याभवन हायस्कूल चे मुख्याध्यापक व्ही.जी.कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या कार्यक्रमास सुमारे ३०० पेक्षा जास्त विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थिती होते. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेत सर्पांविषयीच्या अंधश्रद्धा दूर करून वैज्ञानिक दृष्टिकोनातून विचार करण्याचा संकल्प केला.

## नागरिकांना सुलभ, सहज सेवा मिळाव्यात या दृष्टीने १५० दिवसांचा कृती आराखडा कार्यक्रम



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३१, पुणे :** नागरिकांना सेवा पुरवताना त्या सहजतेने, सुलभरित्या मिळाव्यात यासाठी मुख्यमंत्री यांचा १५० दिवसांचा कृती आराखडा कार्यक्रम यशस्वीरित्या राबवावा, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिले. सर्व अद्ययावत कायदे, नियम, शासन निर्णय आदींची माहिती आपल्या संकेतस्थळावर अपलोड करावी जेणेकरुन नागरिकांचा फायदा होईल, असेही ते म्हणाले.

१५० दिवसांचा कृती आराखडा अंमलबजावणीच्या आढाव्यासाठी विधानभवनात आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, अतिरिक्त आयुक्त (सामान्य प्रशासन) तुषार ठोंबरे यांच्यासह विविध विभागप्रमुख, जिल्हास्तरीय प्रमुख अधिकारी उपस्थित होते. विभागातील जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदी दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

या मोहिमेत कोणतीही शिथीलता येणार नाही याची काळजी घ्यावी, अशा सूचना देऊन डॉ. पुलकुंडवार म्हणाले, ही मोहिम प्रभावीपणे राबविण्याचे राज्याच्या मुख्यमंत्र्यांचे निर्देश आहेत. ई- गव्हर्नन्स सुधारणा, विकसित महाराष्ट्र २०४७ आणि सेवाविषयक सुधारणा हे तीन मुख्य घटक असून सर्व शासकीय सेवा डिजिटल माध्यमातून नागरिकांना मिळाव्यात यावर भर द्यावा. सेवा देताना नियमांची अचूक माहिती असावी यासाठी सर्व अद्ययावत नियम, कायद्यांच्या प्रती उपलब्ध करून ठेवाव्यात. जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर तसेच ज्या जिल्हास्तरीय कार्यालयांची संकेतस्थळे असतील त्यांनी असे नियम, कायदे अपलोड करावेत.

सर्व जिल्हाधिकारी आपल्या अधिनस्त महसूल विभागातील कार्यालये तसेच जिल्ह्यातील सर्व विभागप्रमुखांकडून या आरखड्याच्या अनुषंगाने होत असलेल्या कार्यवाहीचा नियमित आढावा घेऊन गती द्यावी. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या अधिनस्त कार्यालयात हा उपक्रम उत्कृष्ट पद्धतीने राबविण्याबाबत आढावा घेऊन गती द्यावी, असेही ते म्हणाले.

यावेळी श्री. ठोंबरे यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे १५० दिवसांचा कृती आराखडा कार्यक्रमातील समाविष्ट बाबी, राबवावयाचे उपक्रम आदींची माहिती दिली.

आपले सरकार सेवा पोर्टलद्वारे ऑनलाईन सेवा प्रदान करणे, नागरिकांच्या तक्रार निवारण यंत्रणेचे बळकटीकरण करणे, अर्जाची स्थिती जाणून घेण्यासाठी डॅशबोर्ड तयार करणे, व्यवसायांच्या दृष्टीने कामकाजातील कार्यक्षमता वाढविण्यासाठी उद्योग, व्यवसायांना अधिक मदत होईल या पद्धतीने कागदपत्रे कमी करून मंजुरी प्रक्रियेचे टप्पे व वेळ कमी करणे आदी काम या आराखड्यात करणे आवश्यक आहे.

६ मे पासून या उपक्रमाची सुरूवात झालेली आहे. संकेतस्थळ, आपले सरकार, ई-ऑफीस, डॅशबोर्ड, आणि नवीन तंत्रज्ञान आधारित सेवा (वेब ॲप्लिकेशन) यावर आधारित २०० गुणांची ही स्पर्धा आहे.

लवकरच पहिल्या टप्प्यात मोहिमेच्या अंतरिम प्रगतीचा आढावा घेण्यात येणार आहे. २ ऑक्टोबर रोजी मोहिमेचा अंतिम अहवाल सादर करण्यात येणार असून स्पर्धेचा निकाल २५ ऑक्टोबर २०२५ रोजी जाहीर केला जाणार आहे. अंतरिम टप्प्यातील मूल्यमापन क्वालिटी कौंसिल ऑफ इंडिया या बाह्य संस्थेमार्फत करण्यात येणार आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

## लालबाग परळ मधील स्पोर्ट्स व रोहित अकादमीचे अविस्मरणीय यश

**अक्षराज : सुनिल साखरकर**

**दि.३१, मुंबई :** नेरुळ (नवी मुंबई) येथे नुकताच प्रथम हिरा तायक्वानडो अकादमीच्या वतीने, हिरा 'स तायक्वानडो चॅम्पियनशिप-२०२५ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा वय वर्ष ०८, १०, १२, १४ व १७ सब जुनिअर, कॅडेट व जुनिअर वयोगटात व वजनी गटात, क्योरूगी (फाईट) आणि पूमसे (ॲक्शन परफॉरमन्स) या दोन क्रीडा प्रकारात खेळवण्यात आली. सदर स्पर्धेत लालबाग, परळ- भोईवाडा आणि अंबरनाथ परिसरातील दोन्ही अकादमीचे एकूण २३ खेळाडूंनी सहभाग नोंदवून २३ पैकी २३ पदके मिळवली आहेत. यात ८ सुवर्ण, ११ रौप्य आणि ४ कांस्य पदकांची लयलूट करत कमी खेळाडूंमध्ये तिसऱ्या क्रमांकाचे स्थान प्राप्त करण्याचा सन्मान मिळवला.

सदर स्पर्धेत मुंबई, मुंबई -उपनगर, ठाणे, रायगड आणि पालघर जिल्ह्यातील विविध अकादमीतील खेळाडूंमध्ये ही स्पर्धा रंगली, त्यात लालबाग, परळ- भोईवाडा व अंबरनाथच्या खेळाडूंनी आपले कौशल्य पणाला लावून कमी खेळाडूंमध्ये तिसऱ्या क्रमांकाचे स्थान खेचून आणले त्याबद्दल लालबाग येथील एडुकोच्या ट्रस्टी मीनल, शाळा व्यवस्थापक सदफ शेख, रजनीश, गीता लाल, साईबाबा पथ शाळाचे मुख्याध्यापक शुध्दोधन सावंत, राहुल झेंडे शारीरिक शिक्षण शिक्षक श्रद्धा यादव, योगेश साळवी, शाळेचे तायक्वानडो मुख्य प्रशिक्षक सुनिल साखरकर, सह प्रशिक्षक संजय चंदा, अक्षय खोत तसेच रोहित तायक्वानडोचे मुख्य प्रशिक्षक रोहित कदम यांच्या वतीने खेळाडूंचे भरभरून कौतुक करण्यात येत आहे.



### स्पर्धेतील पदक विजेत्या खेळाडूंची नावे पुढील प्रमाणे -

**सुवर्ण पदक विजेते** - १)कार्तिकी वाघरे २)आर्या पाटील ३) नंदिनी पासी ४)आकांशा पासी ५) तेजस्विनी घोरपडे६) वैष्णवी गाडे ७) सोहम कणसे८) लवेश बेतकर

**रौप्य पदक विजेते** - १) सोनाक्षी मिश्रा २) श्रद्धा मिश्रा३) छवी जायस्वाल ४) काव्या लायगुडे ५) साक्षी कुर्मी ६) वेदांत पाटील ७) रोशनी गुप्ता८) विजय गावंडलकर ९) तरुण कोटकल १०) नेत्रा सुतार ११) ग्रीष्मा घाडीगांवकर

**कांस्य पदक विजेते** - १) रिद्धी पाटील २) रिया मिश्रा ३)आदित्य अमराले ४) अर्थवं तायडेसदर स्पर्धेत तेजस्विनी घोरपडे हिस 'बेस्ट फाईटर' हा किताब देऊन गौरवण्यात आले.

## रेल्वे स्थानकांवरील खाद्यपदार्थांच्या दरवाढीतून प्रवाशांची लूट

### खा. प्रतिभा धानोरकर यांचा रेल्वे मंत्रालयावर गंभीर आरोप






**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३१, चंद्रपूर :** बल्लारशाह रेल्वे स्थानकावर खाद्यपदार्थांची छापील किंमतीपेक्षा जास्त दराने विक्री होत असल्याचा मुद्दा खा. प्रतिभा धानोरकर यांनी लोकसभेत उपस्थित केला. यावर रेल्वे मंत्रालयाने दिलेले उत्तर प्रवाशांची दिशाभूल करणारे आणि वास्तवापासून दूर असल्याचे खा. धानोरतर यांनी म्हटले आहे. त्यांनी या गंभीर समस्येकडे अधिक गांभीर्याने पाहण्याचे आवाहन सरकारसा केले आहे.

खा. प्रतिभा धानोरकर यांच्या प्रश्नांना उत्तर देताना रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, रेल्वे स्थानकांवर मंजूर दरानुसार उच्च दर्जाचे आणि आरोग्यदायी अन्न उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न सुरु आहे. जास्त किंमत आकारल्याच्या ४ प्रकरणांमध्ये ३५,५०० रुपयांचा दंड आकारण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले. तसेच, एफएसएसएआय मंजुर वस्तू विकल्या जात असून, नियमित तपासणी केली जात असल्याचेही मंत्र्यांनी सांगितले. मंत्र्यांच्या या उत्तरावर तीव्र आक्षेप नोंदवतांना खा. धानोरकर म्हणाल्या, की, 'रेल्वे मंत्रालय केवळ कागदी घोडे नाचवत आहे.' फक्त चार प्रकरणांवर कारवाई करणे ही 'हिमनगाची फक्त एक टीप' आहे. प्रत्यक्षात शेकडो प्रवाशांना दररोज वाढीव दराने खाद्यपदार्थ खरेदी करावे लागतात. 'नियमित आणि आकस्मिक तपासणी' केवळ कागदावरच असून, 'रेलमदद' सारख्या तक्रार यंत्रणा कुचकामी असल्याचे त्यांनी म्हटले. बिलिंग, डिजिटल पेमेंट आणि आरपीएफ मोहिम हे केवळ दिखाव्याचे उपाय असून, प्रवाशांना अजूनही शुध्द आणि परवडणारे भोजन मिळत नसल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

खा. प्रतिभा धानोरकर यांनी केवळ दंडात्मक कारवाई पुरेशी नसून, प्रभावी अंमलबजावणी आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. प्रवाशांच्या आरोग्याशी आणि हक्काशी कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा त्यांनी दिला. या गंभीर आरोपांवर रेल्वे मंत्रालय कोणती पुढील पावले उचलते, हे पाहणे महत्वाचे ठरेल.

## घणसोली बेघर निवारा केंद्रामध्ये सुविधांच्या पूर्ततेसह घेतली जातेय लाभार्थ्यांची काळजी




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३१, नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत सेक्टर ४, घणसोली येथे बेघर निवारा केंद्र कार्यान्वित असून सद्यस्थितीत १०० बेघर व्यक्ती त्या सुविधेचा लाभ घेत आहेत. तथापि दिनांक २६ जुलै २०२५ रोजी व त्यानंतर काही प्रसार माध्यमाव्दारे बेघर निवारा केंद्रातील एका घटनेबाबतचे वृत्त प्रसिध्द करण्यात आले होते.

वास्तविकत: सदर बेघर निवारा केंद्राच्या महिला कक्षातील दोन महिलांच्या आप-आपसातील भांडणाचा व्हिडिओ एका लाभार्थी महिलेने तिच्या मोबाईलमध्ये जानेवारी, २०२५ मध्ये चित्रित केला होता. सदर व्हिडीओ यापूर्वीच जानेवारी २०२५ मध्ये समाज विकास विभागाला प्राप्त झाला होता. त्या अनुषंगाने समाजविकास विभागाच्या उपआयुक्तांनी त्यावेळी त्वरीत बेघर निवारा केंद्रास भेट देऊन घटनेची सविस्तर माहिती घेतली होती व तेथील सुरक्षा वाढविण्याच्या दृष्टीने तात्काळ उपाययोजना करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार बेघर निवारा केंद्रातील पूर्वीच्या चार सुरक्षा रक्षकांमध्ये वाढ करून तीन सत्रांमध्ये एकूण सात सुरक्षा रक्षक त्याचवेळी तैनात करण्यात आले. तसेच बेघर निवारा केंद्रामध्ये कोणताही अनुचित प्रकार घडू नये. यासाठी तेथील लाभार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने २२ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले. सदर सीसीटिव्ही कॅमेरे सध्या सुस्थितीत कार्यरत आहेत.

मात्र सदर जानेवारी २०२५ महिन्यातील व्हिडीओ त्या महिलेने २६ जुलै, २०२५ रोजी पुन्हा प्रसारित केला, त्यामुळे त्याची बातमी प्रसिध्द झाली. वास्तविकत: सदर महिलेस एनआरआय पोलीस स्टेशन मार्फत बेघर निवारा केंद्रात दाखल करण्यात आले होते. ही पदवीधर असणारी महिला रोज उशीरापर्यंत मोबाईलवर मोठमोठ्याने बोलत असल्याने, त्याचा त्रास महिला कक्षातील इतर महिलांना होत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत होत्या. या कारणास्तव तिचा मोबाईल बेघर निवारा केंद्रातील व्यवस्थापक यांच्याकडून ड्युटीवर कार्यरत सुरक्षा रक्षक यांच्याकडे जमा करण्यात येत असे. विशेष म्हणजे जानेवारी २०२५ मध्ये ज्या दोन महिलांचे भांडण झाले होते व त्याचा व्हिडीओ आता जुलै महिन्यात प्रसारित करण्यात आला, त्या दोन्हीही महिला सध्या बेघर निवारा केंद्रात रहात नाहीत. व्हिडिओ प्रसारित करणा-या सदर महिलेने झालेल्या प्रकाराबाबत सर्वांचीच माफी मागितली असून सदर महिलांना आता बेघर निवारा केंद्रात राहत नाही.

नवी मुंबई महानगरपालिका समाज विकास विभागामार्फत सेक्टर ४ घणसोली येथे हे बेघर निवारा केंद्र १५ मार्च, २०२४ पासून कार्यरत आहे. या केंद्रात सध्या एकूण १०० लाभार्थी राहत असून त्यामध्ये ४८ पुरुष, ५० महिला आणि २ मुले यांचा समावेश आहे.

बेघर निवारा केंद्र चालविणाऱ्या संस्थेचे एकूण ४ कर्मचारी याठिकाणी कार्यरत असून त्यामध्ये १ व्यवस्थापक व ३ काळजीवाहक आहेत. महत्वाचे म्हणजे त्यामध्ये दोन काळजीवाहक महिलांचा समावेश आहे. निवारा केंद्रात राहणाऱ्या महिलांवर तेथील कर्मचाऱ्यांकडून कोणत्याही प्रकारची बळजबरी केली जात नाही. उलट बेघर निवारा केंद्रामुळे आम्हाला मोठा आधार मिळाला असल्याची भावना तेथील लाभार्थ्यांकडून नेहमीच व्यक्त केली जाते.

या बेघर निवारा केंद्रामध्ये स्त्री व पुरुष असे अनुक्रमे पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर स्वतंत्र कक्ष आहेत व तिसऱ्या मजल्यावर बेघर कुटुंबाकरीता खोल्या आहेत. बेघर निवारा केंद्रातील लाभार्थ्यांची नियमितपणे आरोग्य तपासणी केली जाते. तसेच संबंधित अधिकारी यांच्यामार्फत सदर ठिकाणी वेळोवेळी भेटी देऊन तेथील व्यवस्थेची पाहणी केली जाते व लाभार्थ्यांशी सुसंवाद साधला जातो. त्यानुसार आवश्यक कार्यवाही केली जाते.

बेघर निवारा केंद्रात होळी, धुलीवंदन, छत्रपती शिवाजी महाराज जयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, बेघर निवारा दिन, दिवाळी अशा प्रकारचे सण उत्सव देखील सर्वांना सहभागी करून घेऊन साजरे केले जातात. त्यांना प्रसारमाध्यमांतूनही चांगली प्रसिध्द मिळत आहे.

सदरचे वृत्त प्रसारित झाल्यानंतरही त्याठिकाणी समाज विकास विभागाचे उपआयुक्त यांनी प्रत्यक्ष भेट देऊन लाभार्थ्यांशी थेट संवाद साधला. यावेळी केलेल्या चर्चेनुसार त्या ठिकाणी सर्व सोयी-सुविधा व्यवस्थितरित्या पुरविल्या जात असून त्या संदर्भात लाभार्थ्यांची कोणत्याही प्रकारची तक्रार नाही. तशा प्रकारचे लाभार्थ्यांचे समाधानकारक व्हिडीओदेखील काही प्रसारमाध्यमांतून प्रसारित करण्यात आले. नवी मुंबई महानगरपालिका सामाजिक बांधिलकीच्या भूमिकेतून हा बेघरांना आधार देणारा लोकोपयोगी उपक्रम राबवित असून त्या उद्देशाला या वृत्तामुळे नाहक गालबोट लागले आहे. नवी मुंबई महानगरपालिका समाजातील उपेक्षित घटकांबाबत अत्यंत संवेदनशील असून त्या अनुषंगाने बेघर निवारा केंद्रातील सुविधा पूर्तता व व्यवस्थेबाबत अधिक उत्तम अंमलबजावणीसाठी कटिबद्धतेने कार्यरत आहे.

## सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पामुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा

### म्हसोबाझाप येथील प्रकल्पाचे आ.दाते यांचे हस्ते उद्घाटन




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३१, पारनेर (अहिल्यानगर) :** राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा सिंचनासाठी आवश्यक वीज पुरवण्यासाठी राज्य शासनाने मोठा निर्णय घेतला आहे. याअंतर्गत पारनेर तालुक्यात १४,९०० मेगावॅट क्षमतेच्या विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असुन आज तालुक्यातील म्हसोबा झाप परीसरातील ६५० शेतकऱ्यांना दिवसा विजपुरवठा करण्याच्या उद्देशाने उभारण्यात येत असलेल्या प्रकल्पाचे भूमिपूजन पारनेर-नगर मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

उपअभियंता शरद गहांडुळे, उद्योजक दिलीप दाते, मा. सरपंच साहेबराव वाफारे, देवराम मगर, सुभाष दुधाडे, अर्जुन नवले, शिवाजी खिलारी, अर्जुन गाजरे, विकास रोकडे, प्रसाद कर्नावट, भाऊ दरेकर, रंगनाथ दाते, जयसिंग आग्रे, सुकदेव आहेर, महादु आहेर, बाळशिराम शिंदे, अविनाश शेलार, ज्ञानदेव पवार, किसन गुंजाळ, सुधीर दरेकर, महादू दरेकर, अर्चना दाते, सिताबाई रोहकले यांसह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> राज्य सरकारने एप्रिल २०२४ मध्ये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ला मंजुरी दिली होती. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागात ५० टक्के शहरी भागात ६० टक्के अनुदानावर सौर प्रकल्प उभारले जाणार असून यासाठी सार्वजनिक जमिनी उपलब्ध करून सौर ऊर्जा निर्मितीसाठी निविदा प्रक्रिया ओळखून म्हसोबा झाप येथील जमीन उपलब्ध करून देण्यात आल्याने हा प्रकल्प मार्गी लागला.
>
> **- आमदार काशिनाथ दाते (विधानसभा सदस्य)**

यावेळी बोलताना आमदार दाते म्हणाले विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प म्हणजे लहान-लहान सौर ऊर्जा प्रकल्प वेगवेगळ्या ठिकाणी स्थापित करणे. याचा मुख्य उद्देश म्हणजे पारंपरिक ऊर्जा स्रोतांवरची अवलंबित्व कमी करणे आणि स्थानिक पातळीवर वीज निर्मिती करणे. महाराष्ट्रात, 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना अंतर्गत प्रकल्प उभारले जात असून यामुळे शेतकऱ्यांना दिवसा सिंचनासाठी वीज उपलब्ध होणार असल्याचे मनस्वी समाधान आहे.

या योजनेमुळे शेतकऱ्यांची मागणी पूर्ण होणार असून ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण होतील. हा सौर उर्जा निर्मिती प्रकल्प डिसेंबर २०२६ पर्यंत सुरू होणे अपेक्षित आहे.

## नगर पंचायतीचे वरिष्ठ लिपिक हेंद्रे यांचा सेवानिवृत्ती गौरव सोहळा संपन्न




**अक्षराज : लक्ष्मण शेन्नेवाड**

**दि.३१, हिमायतनगर (नांदेड) :** हिमायतनगर येथील नगर पंचायतीचे वरिष्ठ लिपिक मारोती हेंद्रे यांचा सेवा निवृत्ती गौरव सोहळा नगर पंचायतीच्या वतीने नगर पंचायतीच्या पटांगणात माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर, तहसिलदार पल्लवी टेमकर तसेच अनेक मान्यवर व गावकऱ्यांच्या उपस्थितीमध्ये मोठ्या थाटात संपन्न करण्यात आला.

यावेळी माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर तहसिलदार पल्लवी टेमकर व मान्यवरांनी त्यांचा सपत्निक सत्कार केला. व माजी आमदार जवळगावकर नगर पंचायतीचे प्रथम नगराध्यक्ष अ.अखिल अ.हमीद, जि.प.सदस्य सम्मद खान, नगरसेवक ज्ञानेश्वर शिंदे, फेरोज खान, म.जावीद, सरदार खान, उ.बा.ठा.गटाचे जिल्हा उपप्रमुख विठ्ठल ठाकरे, सरपंच महावीर सेठ माळ संदीप तुप्तेवार, संजय माने यांनी हेंद्रे यांच्या कार्याविषयी कौतुक करून आपले मनोगत मांडले.

> **माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर**
>
> मारोती हेंद्रे हे शांत सयमी गरजू जनतेची तात्काळ काम करणारे व्यक्तीमत्व होते. त्यांचा आदर्श इतरांनी घेऊन काम करावे. असे आपल्या मनोगतात सांगुन त्यांचा सेवानिवृत्ती गौरव सोहळ्यात त्यांना पुढील जीवनाविषयी शुभेच्छा दिल्या.

यावेळी नगर पंचायतीचे अव्वल कारकुन महाजन, बालाजी हरडपकर, विठ्ठल शिंदे यासह कर्मचारी असंख्य गावकरी उपस्थित होते.